CNR No. MHRG040036472016

<u>विशेष दिवाणी दावा क्र.१३/२०१८ मधील निशाणी क्र.३६ वरील आदेश</u>

सदरहू अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरूस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.४० अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.४३ अन्वये टंकलेखनाच्या चुकीबाबत पुरशीस दाखल केली.

२. वादींचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, सदर दावा ग्रामस्थ कुंडेवहाल यांच्यामार्फत गावातील पंचपुढारी म्हणुन वादी क्र.१ ते १४ यांनी ग्रामस्थांच्या वतीने दाखल केलेला असुन वादी क्र.१ अनंता पांडूरंग भोईर हे दिनांक ०८/११/२०२० रोजी मयत असुन कोरोना महामारीचा प्रार्दुभाव असल्याने वादींना मृत्यू दाखला मिळण्यास विलंब झाला व वादी क्र.१ मयत झाल्यानंतर इतर वादींना ग्रामस्थ कुंडेवहाल यांचे पंचपुढारी म्हणुन दावा दाखल करण्याचा, चालविण्याचा व दाव्यातील हक्क अबाधित आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, वादी क्र.१ यांचे नाव दाव्यातुन कमी करण्यात यावे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादी क्र.१ मयत झाल्याबाबत सुचित करण्याची जबाबदारी वादींची होती व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक २८/०३/२०२३ रोजी वादी क्र.१ मयत झाल्याबाबत सुचित केल्यानंतर १ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतर अर्ज विलंबाने दाखल केलेला असुन सदर अर्ज ४ वर्षे ४ महिने १६ दिवस विलंबाने दाखल केलेला आहे. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, वादी क्र.१ मयत झाल्यानंतर त्यांना वगळुन दावा पुढे

चालविण्याबाबत ग्रामस्थ कुंडेवहाल यांचा ठराव झाल्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाही. तसेच वादी क्र.१ ते १४ यांना दावा दाखल करण्यास अधिकृत केलेले नसुन वादींनी वैयक्तिकरीत्या दावा दाखल केल्याने प्रातिनिधिक स्वरूपात दाव्यात कोणताही फेरबदल अथवा दाद मागण्याचा वादींना हक्क प्राप्त होत नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी, प्रतिवादी क्र.१ व २ यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, वादींनी सदरहू दावा, दावा मिळकत ही वादींच्या मालकी हक्कातील, ताबेकब्जातील, वहिवाटीतील असुन दिनांक ३१/१२/२०१० रोजीचे प्रतिवादींनी खरेदीखत करण्याकरिता दाखल केलेले मुखत्यारपत्र रद्दबातल व बेकायदेशीर आहे असे जाहीर करून मिळण्याकरिता, दिनांक २३/०४/२०१० रोजीचे खरेदीखत दस्त क्र.पवल-३, ४१७९/२०१०, दिनांक ०५/०३/२०१३ रोजीचे खरेदीखत दस्त क्र.पवल-३, १८४९/२०१३ हे बेकायदेशीर व रद्दबातल असल्याचे जाहीर करून रद्द करून मिळण्याकरिता व मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.३९ अन्वये वादी क्र.१ अनंता पांडूरंग भोईर यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले असुन त्यांचा मृत्यू दिनांक ०८/११/२०२० नमुद असल्याचे दिसुन येते. सदरहू अर्ज दिनांक २४/०३/२०२५ रोजी दाखल करण्यात आला. वादी क्र.१ मयत असुन त्यांचे नाव कमी करणे न्यायोचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**: आदेश :**

वादींना दाव्यात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2025.12.22 17:52:41 +0530

पनवेल
दिनांक २२/१२/२०२५.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल